10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10
भारत 25 SEP 2018 INDIA
दस रुपये TEN RUPEES

जोडपत्र – "अ"
(नियम ३ पहा)

स्था - ५ -
९६११
२५/९/१८

# केंद्रशासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

प्रति,
माहिती अधिकारी
आस्थापना विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

आस्था
२८०
२७/०९/२०१८

माहिती अधिकारी

१. अर्जदाराचे पूर्ण नाव : विलास महादेव सावंत

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता : हाऊस नं. ६८/ए, गुलमोहर बिल्डींगच्या बाजूला, पोस्ट ऑफिस समोर, फाटक रोड, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे ४०११०१

३. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

(एक) माहितीचा विषय : मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सगळ्या वास्तु (उदा. मुख्य इमारत, नगरभवन, हॉल, समाजमंदिर, अग्निशमन केंद्र, आरोग्य केंद्र, उद्याने व इतर) मधील सुरक्षा रक्षकां बाबतची माहिती.

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी : सुरक्षा रक्षक लावल्या पासून

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सगळ्या वास्तु (उदा. मुख्य इमारत (कार्यालय), नगरभवन, हॉल, वाचनालये, समाजमंदिर, अग्निशमन केंद्र, आरोग्य केंद्र, उद्याने व इतर) सुरक्षा करिता तैनात करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना रहाण्या करिता, वीज, पाणी वापर करण्याची मुभा देण्यात आली आहे का तशी व्यवस्था महानगरपालिके कडून करण्यात आली असल्यास याबाबतची सविस्तर मुद्देसुद माहिती कागदपत्रांच्या सत्यप्रतसह मिळावी.

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या सांक्षाकिंत व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात.
शासकिय नियमानुसार होणारी फी मी देण्यास तयार आहे.

ठिकाण : भाईंदर
दिनांक : २५/०९/२०१८

अर्जदाराची सही / ~~अंगठा~~

(श्री/~~श्रीमती~~ विलास महादेव सावंत )
९६१९२५९१११

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

माहितीचा अधिकार

जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./२८७/2018 दि. ३ /१०/2018

प्रति,

श्री. विलास महादेव सावंत,
हाऊस नं.62/ए, गुलमोहर बिल्डिंगच्या बाजुला,
पोस्ट ऑफीस समोर, फाटक रोड,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-401 101.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सगळया वास्तु (उदा. मुख्य इमारत, नगरभवन, हॉल, समाजमंदिर, अग्निशमन केंद्र, आरोग्य केंद्र, उद्याने व इतर) मधील सुरक्षा रक्षकांबाबतची माहिती.

संदर्भ :- आपला दि.25/09/2018 रोजीचा अर्ज. (प्राप्त दि.27/09/2018)

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सगळया वास्तु (उदा. मुख्य इमारत, नगरभवन, हॉल, समाजमंदिर, अग्निशमन केंद्र, आरोग्य केंद्र, उद्याने व इतर) मधील सुरक्षा रक्षकांबाबतची माहिती अपेक्षिलेली आहे. सदर अपेक्षिलेली मुददेनिहाय माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सुरक्षा रक्षक लावल्यापासुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सगळया वास्तु (उदा. मुख्य इमारत, नगरभवन, हॉल, समाजमंदिर, अग्निशमन केंद्र, आरोग्य केंद्र, उद्याने व इतर) सुरक्षा करीता तैनात करण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना रहाण्याकरीता, वीज, पाणी वापर करण्याची मुभा देण्यात आली आहे का अशी व्यवस्था महानगरपालिकेकडुन करण्यात आली असल्यास याबाबतची सविस्तर मुददेसुत माहिती कागदपत्रांच्या सत्यप्रतसह मिळावी. | आपण अपेक्षिलेल्या माहितीबाबत आस्थापना विभागात उपलब्ध असलेले लेखे तपासले असता सदरची माहिती दिसुन येत नाही. |

सदर माहिती उपलब्ध लेख्यानुसार देण्यात येत असुन, सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास, सदर जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. तदनंतर समाधान न झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी, श्री. विजयकुमार म्हसाळ, मा. उप-आयुक्त (मुख्यालय) तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात अपील करता येईल.

(जगदिश भोपतराव)
जनमाहिती अधिकारी तथा
आस्थापना अधीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

Deepa\d\EST\Mahiti Adhikar Letters (A-4) 2017.docx

११९